नगरसचिव

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.७**

**सप्टेंबर २०१९**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि.९/९/२०१९ रोजी दुपारी ३:००(तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**वृत्तांत कायम करणे.**

**नेमणूक**

विषय क्र.५७८

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(म) (28(2)(y)) नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर महानगरपालिकेच्या सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याची नेमणूक करणेबाबत मा.उपकुलसचिव,निवडणूक विभाग यांचे ८/८/२०१९ चे पत्र.

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**मा.महापालिका आयुक्त यांची पत्रे.**

विषय क्र.५७९

पुणे,पेठ बाणेर स.नं.१०४/१, १०५/३ येथील पी.एम.टी.–१ व पार्किंग (पी–७) या आरक्षित जागेकरिता जागामालक सौ.इंदिरा शेट्टी यांनी पुणे म.न.पा.स. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम १२६ भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेसाठी मा.मुख्य सभेची मान्यता घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ. /२१८,दि.९/८/२०१९ चे पत्र.

विषय क्र.५८०

पुणे,पेठ बालेवाडी स.नं.३४/१ येथील उद्यानासाठी(जी–१) आरक्षित जागेकरिता जागामालक देवी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री.विनोद बाणी यांनी पुणे म.न.पा.स.महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम १२६ भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेसाठी मा.मुख्य सभेची मान्यता घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ. /२९१,दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचा प्रस्ताव**

विषय क्र.५८१

संदर्भ – मा.पृथ्वीराज सुतार,गटनेते,शिवसेना यांची सूचना दि.१३/८/२०१९

---

महाराष्ट्राच्या पोलिस दलातील कर्तबगार,धाडसी व समाजसेवी पोलिस अधिकारी व सध्या पुण्याच्या पोलिस दलातील उत्तर विभागाचे अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री.सुनिल फुलारी यांना राज्य सरकारचा मानाचा वनश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल पुणेकर जनतेच्या वतीने ही सभा त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देत आहे. सदरचा ठराव मा.महापौर यांनी मा.श्री.सुनिल फुलारी यांच्याकडे पाठवावा.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–२७/८/२०१९.

**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**